# राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे
## महाराष्ट्र राज्य

| | | |
|---|---|---|
| अतिरिक्त संचालक<br>दुरध्वनी क्रमांक (वै)<br>दुरध्वनी क्रमांक (का) | २६०५८९९६ (वै)<br>२६०५८७३९ (का)<br>२६०५८१३९ (का)<br>२६०५८४७६ (का) | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण,<br>माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, कुटुंब कल्याण भवन, राजा बहादूर मिल रोड, पुणे रेल्वे स्टेशन मागे, पुणे — ४११००१, दुरध्वनी— ०२० — २६०५८२१८, २६०५८१०९<br>Email — spm.pune@gmail.com |
| आरोग्य सेवा | | जा.क्र.राकुकका/बाल आरोग्य- १५क/ "MAA – Mother's Absolute Affection" मागदर्शक सूचना/ /२०१६<br>दि.२१/०९/२०१६. ६२५२३-६२८ |

प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद,.............(सर्व.)

२) जिल्हा शल्य चिकित्सक,
सामान्य रुग्णालय,..........(सर्व)

३) वैद्यकिय आरोग्य अधिकारी,
महानगरपालिका,.............(सर्व)

**विषय :-** Nationwide Breastfeeding promotion & support campaign – "MAA – Mother's Absolute Affection". राबविण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना.....

**संदर्भ :-** १) केंद्र शासनाचे दिनांक २८ जुलै २०१६ रोजी प्राप्त झालेले पत्र क्र Z-28020/155/2012- CH.(Part) Dated the 28th July 2016

२) केंद्र शासनाचे दिनांक २८ जुलै २०१६ रोजी प्राप्त झालेले पत्र क्र Z-28020/155/2012- CH.(Part) Dated the 1st August 2016.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये नवजात शिशूंच्या आरोग्यासाठी स्तनपान ही अत्यंत महत्वाची गरज आहे. राज्यातील अर्भक मृत्यू व बालमृत्यू कमी करणे ही शासनाची प्राथमिकता आहे. १ तासाच्या आत बालकांना स्तनपान दिल्यास २० % नवजात शिशूंचे मृत्यू टाळता येणे शक्य आहे. ज्या बालकांना पहिल्या ६ महिन्यांपर्यंत निव्वळ स्तनपान दिले जाते त्या बालकांमध्ये अतिसारामुळे होणाऱ्या मृत्यूची शक्यता ११ पटीने तर न्युमोनिआमुळे होणाऱ्या मृत्यूची शक्यता १५ पटीने कमी असते.

एनएफएचएस-४ च्या सर्व्हेनुसार महाराष्ट्रात ९० % प्रसुती संस्थांमध्ये होत आहेत मात्र जन्मानंतर १ तासाच्या आत स्तनपानाचे प्रमाण फक्त ५७.५ % आहे. तसेच ६ महिने निव्वळ स्तनपानाचे प्रमाण ५६.६ % आहे आणि ६ ते ८ महिन्या दरम्यान बाळाला पुरक आहार देण्याचे प्रमाण हे ४३.३ % आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता नवजात व अर्भकमृत्यू कमी करण्याकरिता स्तनपानाला प्रोत्साहन देणे महत्वाचे आहे. या मध्ये बाळाला १ तासाच्या आत स्तनपान, ६ महिन्यापर्यंत निव्वळ स्तनपान व २ वर्षापर्यंत स्तनपान सुरु ठेवणे या बाबींना अधोरेखित करणे महत्वाचे आहे. आयवायसीएफ कार्यक्रमाद्वारे स्तनपानास प्रोत्साहन, संरक्षण व आधार देण्यात येतो.

MAA हा महत्वाकांक्षी कार्यक्रम राज्यात सप्टेंबर २०१६ पासून सुरु करण्यात येत आहे. ज्याद्वारे स्तनपानाचे महत्त्व विषद करणाऱ्या विविध कृतीवर भर देण्यात येत आहे. MAA **म्हणजे आईचे परिपुर्ण प्रेम** जे बाळाला स्तनपानाद्वारे देण्यात येते. स्तनपानावर बाळाचे संपुर्ण आरोग्य अंवलबून असते. राष्ट्रीयस्तरावर हा कार्यक्रम ५ ऑगस्ट २०१६ रोजी सुरु करण्यात आला आहे.

**कार्यक्रमाची ध्येय व उद्दिष्टे :**

आरोग्य यंत्रणेमार्फत स्तनपानाला प्रोत्साहन, संरक्षण व संवर्धन करणे व स्तनपनाचे प्रमाण वाढवणे हे MAA कार्यक्रमाचे ध्येय आहे. हे ध्येय साध्य करण्याकरिता खालीलप्रमाणे उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१) बाल जिवित्व, बालकांची वाढ व त्यांच्या विकासासाठी स्तनपान अत्यंत महत्वाचे आहे. याकरिता गरोदर माता, स्तनदा माता व त्यांचे कुटुंबिय तसेच समाजामध्ये स्तनपानाबाबत जनजागृती करणे.

२) सार्वजनिक आरोग्य संस्थांमधील प्रशिक्षित मनुष्यबळाद्वारे स्तनपानाबाबत मार्गदर्शन करणे.

३) ज्या संस्थांमध्ये स्तनपानाच्या व्यवस्थापनासोबत बाळांचे स्तनपानाचे प्रमाण जास्त आहे अशा संस्था निश्चित करणे व त्यांना प्रोत्साहन देणे.

**कार्यक्रमाचे घटक :-**

| | |
|---|---|
| अ जनजागृती - | प्रसिध्दी साहित्य व प्रसार माध्यमाद्वारे जनजागृती करुन पोषक वातावरण तयार करणे. |
| ब सामाजिकस्तरावर विविध उपक्रमांचे आयोजन - | • स्तनपान व शिशुपोषणाबाबत आशा/अंगणवाडी कार्यकर्ती आणि एएनएम यांचे बळकटीकरण करणे.<br>• आशांद्वारे माता बैठकीमध्ये स्तनपान व शिशुपोषणाबाबत महत्वाचे संदेश देणे. ग्राम आरोग्य दिनाच्या दिवशी स्तनपानाला प्रोत्साहन देण्यासाठी आरोग्य सेविकेने गरोदर माता/स्तनदा माता यांच्याशी संवाद साधणे व समुपदेशन करणे. |
| क आरोग्य संस्थांचे बळकटीकरण - | • स्तनपान व शिशुपोषण व्यवस्थापना बाबत एएनएम /स्टाफ नर्स /वैद्यकिय अधिकारी यांची कार्यक्षमता वाढविणे |

- सर्व प्रसुती केंद्रामध्ये स्तनपान व शिशुपोषणाबाबतची अंमलबजावणी प्रभावीपणे करणे.

ड संनियंत्रण व मूल्यमापन - कार्यक्रमाचे संनियंत्रण व मूल्यमापन करुन पुरस्कार वितरीत करणे.

## अ) जनजागृती करुन पोषक वातावरण निर्मीती

या कार्यक्रमांबाबत समाजामध्ये जनजागृती करण्यात यावी व त्याबाबत पोषक वातावरण तयार करण्यात यावे. याकरिता वेगवेगळया प्रसिध्दी माध्यमांचा वापर करण्यात यावा, प्रसिध्दी साहित्य तयार करण्यात यावे. स्तनपानामुळे अतिसार, न्युमोनिया यासारख्या जीवघेण्या आजारांपासून बाळाचा बचाव होतो, साथीच्या रोगांपासून सरंक्षण होण्यास मदत होते, स्तनपानास अडचणी आल्यास आवश्यक संदर्भ सेवा इत्यादीबाबतची माहिती लोकांपर्यंत प्रसिध्दी माध्यमांद्वारे पोह्चविण्यात यावी. यासाठी खालील बाबींचा अवलंब करावा.

❖ **प्रसिध्दी साधनांचा वापर :-**

- द्रृकश्राव्य माध्यमांचा वापर (दूरदर्शन) त्याचप्रमाणे श्राव्य साधनांद्वारे (रेडिओ) माहिती देणे, वर्तमान पत्राद्वारे जनजागृती करणे, एसएमएसद्वारे संदेश पाठविणे इत्यादी पध्दतीने कार्यक्रमांची प्रसिध्दी करण्यात यावी.
- स्तनपान व शिशुपोषणाबाबतचे पोस्टर, हस्तपत्रिका, बस पॅनेल इत्यादींचा वापर करावा तसेच इतर सार्वजनिक ठिकाणी आरोग्य शिक्षण साहित्याचा वापर करुन जनजागृती करावी.
- सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे कलापथकांच्या माध्यमातून पथनाटये, जत्रांमधील गाणी, स्थानिक करमणुकींचे कार्यक्रम इत्यादी प्रकाराच्या कार्यक्रमांद्वारे या विषयाची प्रसिध्दी करण्यात यावी.

❖ **सामाजिक बांधिलकी व इतर विभागांशी समन्वय :-** स्तनपान ही एक लोक चळवळ होण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरावर खालील कृती करणे आवश्यक आहे.

- **खाजगी संस्थांचा सहभाग :-** ज्या खाजगी संस्थांमध्ये प्रसुतीचे प्रमाण जास्त आहे असे सर्व खाजगी दवाखाने त्याचप्रमाणे, आयएमए, आयएपी, फॉग्झी यांसारख्या संघटनांचा या कार्यक्रमात सहभाग घेणे.
- **इतर विभागांचा समन्वय :-** महिला बाल कल्याण विभाग, नगर विकास विभाग, आदिवासी विकास विभाग व ग्राम विकास विभाग इत्यादींशी समन्वय साधणे व जोखिमग्रस्त कार्यक्षेत्राच्या विकासाकरिता युनिसेफ, जागतिक आरोग्य संघटना यांची मदत घेण्यात यावी.

* **सभा व कार्यशाळा :-** जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर विविध सभा व कार्यशाळेचे आयोजन करण्यात यावे. ज्यामध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, धार्मिक प्रतिनिधी, पंचायत प्रतिनिधी व शिक्षक इत्यादी प्रतिष्ठीत लोकांची कार्यशाळा घेण्यात यावी.

## ब) सामाजिक स्तरावर विविध उपक्रमांचे आयोजन

समाजामध्ये गरोदर मातेबरोबरच तिच्या कुटुंबियांना देखील स्तनपानाबाबतची शास्त्रोक्त माहिती देणे आवश्यक आहे. ज्या मातेला बाळाला स्तनपान देण्याबाबत समस्या आहेत जसे स्तनामध्ये गळू होणे, स्तनाग्रे आत ओढली जाणे, स्तनास सुज येणे, बाळास स्तनपान करु न शकणे व आईला पुरेसे दूध नसणे इत्यादी समस्यां असणाऱ्या मातांचे समुपदेशन करावयाचे आहे. हे समुपदेशन गावपातळीपासून सर्व आरोग्य संस्थांमध्ये आशा, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेविका, वैद्यकिय अधिकारी, परिचारिका संवर्गातील सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत केले जावे. या कार्यक्रमांतर्गत खालील उपक्रम राबविण्यात यावेत.

❖ **आशांकरिता एकदिवशीय कार्यशाळेचे आयोजन :-** समाज व आरोग्य संस्था यामधील आशा ही महत्वाचा दुवा आहे. स्तनपानाविषयी शास्त्रोक्त माहिती देणे, मातांना मार्गदर्शन करणे, आवश्यक तेथे संदर्भ सेवा देणे इत्यादी बाबींबाबत आशा मोडूयल ६ आणि ७ वर आधारित एकदिवशीय प्रशिक्षण आशांच्या मासिक बैठकीमध्ये आयोजित करण्यात यावे. या प्रशिक्षणासाठी शासनाकडून देण्यात आलेल्या "एक दिवशीय प्रशिक्षण सत्राचे मोडयूल" चा वापर करण्यात यावा. या प्रशिक्षण सत्रामध्ये अंगणवाडी कार्यकर्तीना देखील प्रशिक्षण द्यावे. आशांच्या नियमित घरभेटीमध्ये स्तनपानाविषयीची माहिती देणे त्याचप्रमाणे स्तनपानाला प्रोत्साहन देण्यासंबंधीचे समुपदेशन करण्याबाबतच्या विषयांचा तसेच स्तनाच्या मूळ व्याधी/आजार व त्यांचे उपचार यांचा समावेश असावा.

❖ **माता बैठक :-** या बैठकीमध्ये एएनएम व आशांनी स्तनपानाविषयी व पुरक आहारा विषयी मातांना प्रात्याक्षिकांसह माहिती दयावी. यासाठी प्रपत्र क्र. १ चा वापर करण्यात यावा.

* घरभेटीमध्ये व्यक्तीगत संवादाद्वारे गरोदर माता व स्तनदा माता यांना स्तनपानाचे फायदे व स्तनपानाची शास्त्रीय पध्दती याबाबत समुपदेशन करण्यात यावे.

- समुपदेशन करण्यासाठी खास तयार करण्यात आलेल्या माहितीचे किट तसेच फिल्प चार्टचा वापर करण्यात यावा.
- आशांनी तिच्या कार्यक्षेत्रातील गरोदर माता व स्तनदा माता यांची यादी तयार करावी.
- सर्व साधरणपणे एका गावामध्ये ४० ते ५० माता अपेक्षित आहेत. त्यापैकी एका माता बैठकींसाठी ५ ते ८ मातांचा एक गट अपेक्षित आहे. त्यानुसार महिन्यातून तीन वेळा अशा पध्दतीने तीन महिन्यामध्ये ८ ते १० सभा आयोजित कराव्यात.
- अशा पध्दतीने एका तिमाहीमध्ये होणाऱ्या सभांकरिता रु. १००/- याप्रमाणे तीन तिमाहीचे रु.३००/- मानधन आशाला देय असेल.
- सदर सभेकरिता आधार गटाची देखील मदत घेता येईल.

❖ **आशांच्या नियमित घरभेटीमध्ये स्तनपानाला महत्व देणे :-**

आशांनी त्यांच्या नियमित घर भेटीमध्ये नवजात बालकांची काळजी घेताना अथवा कमी वजनाच्या बालकांचा पाठपुरावा करताना आणि एसएनसीयुमधून डिस्जार्च मिळालेल्या बालकांचा पाठपुरावा करताना स्तनपानाचे महत्व समजावून सांगणे महत्वाचे आहे.

❖ **उपकेंद्र व ग्राम आरोग्य व पोषण दिनाच्या ठिकाणी स्तनपानाविषयी माहिती देणे:-**

प्रशिक्षित आरोग्य सेविकेद्वारे उपकेंद्रामध्ये व ग्राम आरोग्य व पोषण दिनाच्या दिवशी स्तनपानाविषयी माहिती देण्यात यावी. याकरिता आयवायसीएफ अंतर्गत दिलेल्या प्रशिक्षणाचा व MAA कार्यक्रमा अंतर्गत पुरविण्यात आलेल्या फिल्प चार्टचा उपयोग करण्यात यावा.

## क) आरोग्य कर्मचाऱ्यांचे बळकटीकरण

संस्थास्तरावर होणाऱ्या प्रसुतीमध्ये मातेला स्तनपान करताना येणाऱ्या अडचणी लक्षात घेता त्यांचे निराकरण करणे गरजेचे आहे. प्रसुतीनंतर एक तासाच्या आत स्तनपान व ६ महिन्यांपर्यंत निव्वळ स्तनपान याबाबत मातांना प्रोत्साहन देण्यासाठी एएनएम, वैद्यकिय अधिकारी यांच्या कार्यक्षमतेचे बळकटीकरण करणे आवश्यक आहे. यासाठी खालील प्रमाणे बाबी अवलंबणे आवश्यक आहे.

❖ **आरोग्य कर्मचाऱ्यांचे एक दिवसीय प्रशिक्षण.**

- MAA कार्यक्रमा अंतर्गत एक दिवशीय कार्यशाळेत स्तनपानाबाबत आरोग्य कर्मचाऱ्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या (प्रपत्र -२ प्रमाणे) आणि संस्थास्तरावर स्तनपानास प्रोत्साहन देण्यासाठी त्यांचा सहभाग याबाबतचा प्रशिक्षण घेण्यात यावे. आरोग्य कर्मचाऱ्यांचे आयवायसीएफचे ४ दिवसांचे प्रशिक्षण घेण्यापुर्वी थोडक्यात व लवकरात लवकर आयवायसीएफ बाबतची माहिती देणे आणि रुग्णसेवेशी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संबध

असलेल्या सर्व आरोग्य कर्मचा-यांनी मातांना स्तनपान व शिशु पोषणबाबत साहय करण्यास सक्षम करणे हे या एक दिवसीय कार्यशाळेचे उद्दिष्ट आहे.

- प्रत्येक कार्यक्रमांतर्गत नेमण्यात आलेले समुपदेशक (उदा.आरएमएनसीएच/आयसीटीसी) व संस्थास्तरावरील स्टाफ नर्स/एएनएम/वै.अ. आणि उपकेंद्राच्या एएनएम यांच्यासाठी हे प्रशिक्षण असावे. जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर सदर प्रशिक्षण घेण्यात यावे.
- आयएमएस कायदयाची माहिती देणे हा या कार्याशाळेचा महत्वाचा भाग आहे.
- **प्रधान मंत्री सुरक्षित मातृत्व अभियाना अंतर्गत प्रत्येक महिन्याच्या ९ तारखेला सुध्दा स्तनपानाविषयी मातांचे समुपदेशन करण्यात यावे. निव्वळ स्तनपानाबाबत** Birth Campanion **च्या सहभागाचे महत्व पटवून देणे.**

❖ **आयवायसीएफबाबत सर्व उपकेंद्रातील एएनएमचे प्रशिक्षण :-**

- MAA कार्यक्रम सुरु झाल्यानंतर एएनएमचे एक दिवशीय प्रशिक्षण घेण्यात यावे. यासाठी एक दिवशीय प्रशिक्षण मोडयूलचा वापर करण्यात यावा.
- त्यानंतर टप्याटप्याने आयवायसीएफ प्रशिक्षण सत्रांमध्ये सर्व उपकेंद्रांच्या एएनएमचे ४ दिवशीय प्रशिक्षण घेण्यात यावे.
- सदर प्रशिक्षण सत्रांमध्ये एएनएमला आयवायसीएफबाबतचे समुपदेशन करण्यासाठी MAA फिल्प चार्टचा वापर करण्यात यावा.

❖ **एएनएम व नर्सेसेची क्षमता वाढविणे आणि मुख्य प्रशिक्षक तयार करणे :-**

MAA कार्यक्रम सुरु झाल्यानंतर सर्वात महत्वाची प्रक्रिया म्हणजे मुख्य प्रशिक्षक तयार करणे. प्राचार्य/साथरोग शास्त्रज्ञ आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, वैद्यकिय अधिकारी जिल्हा प्रशिक्षण पथक, वैद्यकिय अधिकारी रुग्णालय प्रशिक्षण केंद्र, प्राचार्य नर्सिंग स्कूल आणि वैद्यकिय महाविद्यालयाचे पीएसएम विभाग व बालरोग तज्ञ यांच्या सहाय्याने ही प्रक्रिया वर्षभर राबविण्यात यावी. मुख्य प्रशिक्षक हे आलटून पालटून वैद्यकिय अधिकारी व स्टाफ नर्स तसेच प्रसुती संस्थांमधील एएनएम यांना चार दिवसाचे प्रशिक्षण देतील. जेथे प्रसुती जास्त होतात अशा संस्थांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे. यामध्ये खालील प्रमाणे नियोजन करावे.

| अ. क्र. | प्रशिक्षणस्तर | प्रशिक्षक | प्रशिक्षणार्थी |
|---|---|---|---|
| १ | राज्यस्तर | व्हिडीओ कॉन्फरन्स | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, निवासी वैद्यकिय अधिकारी (बाहय संपर्क), जिल्हा प्रजनन व बाल आरोग्य अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी - (महिला व बाल विकास ) |
| २ | जिल्हास्तर | आरोग्य व कुटुंब | प्रभारी वैद्यकिय अधिकारी/वैद्यकिय अधिक्षक/ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कल्याण प्रशिक्षण केंद्र, जिल्हा आशा समन्वयक | जिल्हा आशा समन्वयक/तालुका आरोग्य अधिकारी/ जिल्हास्तरीय इतर अधिकारी व पर्यवेक्षक/एनएचएम कक्षातील कार्यक्रम अधिकारी/बाल विकास प्रकल्प अधिकारी/ जिल्हा आरोग्य परिचारीका/ मेट्रन /असिस्टंट मेट्रन/प्राचार्य नर्सिंग स्कूल |
| ३ | तालुकास्तर-उपजिल्हा | जिल्हा प्रशिक्षण पथक | वैद्यकिय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र/ग्रामीण रुग्णालय व तसेच उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकिय अधिकारी/ इनचार्ज सिस्टर/स्टाफ नर्सेस्/असिस्टंट मेट्रन/आरोग्य सहाय्यक (पुरुष/स्त्री)/गटप्रर्वतक, तालुका समुह संघटक, व तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातील इतर कर्मचारी व आरोग्य सेवक (स्त्री व पुरुष)/मुख्य सेविका |
| ४ | प्राथमिक आरोग्य केंद्रस्तर | बीएनओ/तालुका समुह संघटक/जिल्हा प्रशिक्षण पथक/वैद्यकिय अधिकारी/आरोग्य सहाय्यक | आशा/अंगणवाडी कार्यकर्ती |

❖ **संस्थांचे बळकटीकरण :-**

सर्व आरोग्य संस्था या आरोग्य प्रसिध्दी साहित्यासह सुसज्ज असाव्यात. स्तनपाना संबंधी असलेले प्रसिध्दी साहित्य हे एएनसी वॉर्ड, प्रसुती वॉर्ड व एएनसी क्लिनीकस् मध्ये प्रामुख्याने प्रदर्शित करण्यात यावे. तसेच प्रसुती केंद्र आणि संस्था चाईल्ड फेंन्ड्रली करण्याबाबतच्या १० पायऱ्या बाबतचे पोस्टर संस्थांमध्ये प्रदर्शित करण्यात यावे.

❖ **हिरकणी कक्ष :-**

सर्व आरोग्य संस्थांमध्ये स्तनपानासाठी हिरकणी कक्षाची स्थापना मार्गदर्शक सूचनानुसार करण्यात यावी. जेणे करुन स्तनपानाला प्रोत्साहान मिळेल व स्तनपानाच्या मुख्य उद्देशाला पुरस्कृत केले जाईल.

## ड) कार्यक्रमाचे संनियंत्रण, मुल्यमापन व पुरस्कार :-

❖ **पुरस्कार** :- मार्गदर्शक सूचनाप्रमाणे ज्या संस्थांनी स्तनपानास प्रोत्साहन देण्यासाठी संस्थाचे बळकटीकरण केले आहे आणि ज्यांची या कार्यक्रमाबाबतची कामगिरी चांगली असेल अशा संस्थांची शिफारस करुन त्यांना पुरस्कार देण्यात यावा. तो खालील प्रमाणे.

१) पुरस्कार हा "MAA - मदर ॲबसोल्युट अफेक्शन ॲवॉर्ड" या नावाने प्रमाणित असेल.

२) नियमाची पुर्तता करणाऱ्या प्रत्येक जिल्हयातील एका संस्थेला ॲवॉर्ड देण्यात येईल.

३) एएनएम, स्टाफ नर्स, डॉक्टर, स्त्रीरोग तज्ञ/बालरोग तज्ञ या पुर्ण पथकाला रोख रु. १०,०००/- प्रति संस्था असे त्याचे स्वरुप असेल.

४) संनियंत्रण व मुल्यमापनानंतरच हा पुरस्कार देण्यात येईल.

❖ **कमीत कमी ६ महिने खालील निकष पूर्ण करणाऱ्या संस्थांना पुरस्कार देण्यात यावा.**

- आयवायसीएफ बाबतचे धोरण लिखित स्वरुपात सर्व संस्थांमध्ये असावे आणि सर्व अधिकारी व कर्मचारी यांना याबाबत माहिती असावी.
- सदर धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण दिलेले असावे.
- सर्व गर्भवती मातांना स्तनपानाबाबतची योग्य माहिती व फायदे सांगितले जात असावेत.
- मातांना एका तासाच्या आत बाळाला स्तनपान करण्यासाठी मदत करण्यात येत असावी.
- मातांना स्तनपानाच्या योग्य पध्दतीबाबत व काही अपरिहार्य कारणास्तव बाळापासून आई दूर असेल तरी स्तनपान सुरु ठेवण्याबाबत माहिती व प्रात्यक्षिक दाखविले जात असावे.
- नवजात अर्भकांना वैद्यकिय सल्ल्याशिवाय आईच्या दुधाव्यतिरिक्त इतर कोणतेही पदार्थ दिले जात नसावेत.
- माता व बाळ २४ तास एका कक्षामध्ये सोबत राहत असावेत.
- बाळ मागेल तेंव्हा स्तनपान देण्यासाठी मातेला प्रोत्साहन दिले जात असावे.
- बाळाला स्तनपानासाठी कृत्रिम निपल वापरले जात नसावे.
- मातेला डिस्चार्ज दिल्यानंतर प्रशिक्षित आरोग्य सेविकेवर पाठपुरावा करण्याची जबाबदारी निश्चित करण्यात येत असावी.

❖ **संस्थांचे संनियंत्रण व मुल्यमापन :-**

- MAA कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे त्रैमासिक मुल्यमापन राज्यस्तरावरुन निवडलेल्या अधिकाऱ्यांमार्फत करण्यात येईल.
- मुल्यमापन करण्यारे अधिकारी हे आयवायसीएफ प्रशिक्षीत असणे अपेक्षित आहे.
- राज्य गुणवत्ता हमी समिती आणि जिल्हा गुणवत्ता हमी समिती मार्फत देखील कार्यक्रमांचे मुल्यमापन करण्यात यावे.

❖ **अहवाल व महत्वाचे निर्देशांक :-**

- प्रत्येक त्रैमासिकानतंर आशांनी आपला अहवाल ए.एन.एम कडे सादर करावा.
- ए.एन.एम.ने तालुका आरोग्य अधिकारी यांना आणि तालुका आरोग्य अधिकारी यांनी जिल्हास्तरावर अहवाल सादर करावा.

- जिल्हास्तरावरुन मासिक अहवाल तसेच प्रशिक्षणाचा अहवाल व मुल्यमापनाचा अहवाल दरमहा जिल्हा प्रजनन व बाल आरोग्य अधिकारी यांनी राज्यस्तरावर सादर करावा. (सोबत अहवालाचे नमुने जोडण्यात आले आहेत).
- खालील निर्देशकांचे सनियत्रंण करण्यात यावे.
  - तालुका स्तरावरील सभेमध्ये आयवायसीएफ प्रशिक्षण देण्यात आलेल्या आशांची संख्या व टक्केवारी.
  - माता बैठकीस उपस्थित गरोदर माता व स्तनदा माता यांची संख्या व टक्केवारी.
  - आयवायसीएफ माहिती पुस्तिका संच उपलब्ध असलेल्या आशांची संख्या व टक्केवारी.
  - माता बैठकीकरीता प्रोत्साहन भत्ता देण्यात आलेल्या आशांची संख्या व टक्केवारी.
  - ४ दिवसाचे प्रशिक्षण देण्यात आलेल्या आरोग्य सेविका व परिचारीका यांची संख्या व टक्केवारी.
  - एक दिवसाचे प्रशिक्षण देण्यात आलेल्या आरोग्य सेविकांची संख्या व टक्केवारी.
  - सर्व कर्मचाऱ्यांना एक दिवसीय प्रशिक्षण दिले गेलेल्या प्रसुती केंद्राची संख्या व टक्केवारी.
  - MAA पुरस्कार मिळालेल्या आरोग्य संस्थांची संख्या.
  - MAA कार्यक्रमांचे उद्‌घाटन केलेल्या आरोग्य संस्थांची संख्या.

❖ **जिल्हास्तरावर हा कार्यक्रम राबविण्याबाबतचे नियोजन :-**

१) जिल्हास्तरावरील उद्‌घाटन हे तेथील लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत आणि प्रतिष्ठीत नागरीक यांच्या उपस्थितीमध्ये करण्यात यावे

२) जिल्हास्तरावर नमूद केल्याप्रमाणे एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात यावी.

३) सप्टेंबर २०१६ अखेर सर्व आशांचे प्रशिक्षण पूर्ण करण्यात यावे.

४) MAA पुरस्कार मिळविण्यासाठी आरोग्य संस्थांना पुरस्कृत करण्यात यावे.

५) अहवाल सादरीकरणासाठी एएनएम आणि आशा यांची मदत घ्यावी. कार्याक्रमाचा अहवाल गाव पातळीवरुन उपकेंद्राला, उपकेंद्राकडून प्राथमिक आरोग्य केंद्राकडे व प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावरुन जिल्हा आरोग्य अधिकारीस्तरावर पाठविण्यात यावा. तसेच ग्रामीण रुग्णालय / उपजिल्हा रुग्णालयस्तरावरील अहवाल जिल्हा रुग्णालयस्तरावर पाठविण्यात यावा.

६) सदर कार्यक्रमाचा एकत्रित अहवाल जिल्हा आरोग्य अधिकारीस्तरावरुन राज्यस्तरावर पाठविण्यात यावा.

**याप्रमाणे MAA कार्यक्रम सर्वस्तरांवरुन उत्कृष्टरित्या राबविण्यात यावा. सदर क्रर्यक्रमाच्या वित्तीय मार्गदर्शक सुचना अलाहिदा पाठविण्यात येतील.**

**अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा,**
**कुटुंब कल्याण, माता बाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे.**

**प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी :-**
उपसंचालक, आरोग्य सेवा, मंडळ ..... सर्व.
२/- आपल्या मंडळातील जिल्हयांमध्ये उपरोक्त सूचनांचे या कार्यक्रमाची अंमलबजावणी होण्यासाठी पाठपुरावा करावा.

**प्रत सविनय सादर :**
१) मा.संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) मा. आयुक्त (कु.क) तथा अभियान संचालक, एनआरएचएम, मुंबई.
३) मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

# प्रपत्र -१

## माता बैठका व समूह बैठकांमधील आशामार्फत दयावयाचे संदेश :-

**मातांची बैठक :-** आशांनी मातांची बैठक आयोजित करावी. या बैठकीत गर्भवती माता, स्तनदा माता व त्यांच्या कुंटुबातील सदस्य सासू, नंणद, यांना आमंत्रित करावे. तसेच ज्या मातांनी आपल्या बालकांना यशस्वीपणे स्तनपान केले असेल अशा मांताचाही समावेश असावा. या बैठकीचा उद्देश स्तनपानासाठी मातांना पुढील प्रमाणे मदत करणे हा आहे.

१) मातांना प्रात्यक्षिक व शास्त्रोक्त माहिती देऊन (स्तनपानाबाबतच्या) निर्णयासाठी मदत करणे.

२) मातांना स्तनपान सुरु ठेवण्यासाठी नैतिक व आवश्यक भावनिक आधार देणे ज्यामुळे स्तनपानाच्या त्यांच्या निर्णयाची अंमलबजावणी करणे त्यांना शक्य होईल तसेच त्यांच्या या अनुभवामुळे त्यांना चांगले वाटेल.

❖ **माता बैठकीमध्ये देण्यासाठी मुख्य संदेश :-**

१) जन्मानंतर लगेचच १ तासाच्या आत स्तनपान सुरु करावे.

२) जन्मांनतर ६ महिन्यापर्यंत आईचे दूध हे सर्वात महत्वाचे एकमेव अन्न व पेय आहे. इतर कोणतेही अन्नपदार्थ किंवा पेय तसेच पाणी सुदधा या काळात बाळाला देणे गरजेचे नाही.

३) बाळ ६ महिन्याचे झाल्यानंतर बाळाला पूरक आहार सुरु करण्यात यावा. त्याचसोबत स्तनपान वयाच्या २ वर्षापर्यंत सुरु ठेवावे. कारण तेच पोषण आहाराचे व उर्जेचे स्त्रोत आहे आणि आजारापासून बचाव करते.

४) स्तनपानासोबतच ६ - ८ महिन्याच्या बाळाला दिवसातून २ ते ३ वेळा जेवण भरवायाला हवे. त्यानंतर ९ महिन्यापासून ३ ते ४ वेळा खायला दिले पाहिजे. जेवणा व्यतिरिक्त मधल्यावेळामध्ये एक किंवा दोन पोषक अल्पोपहार (जसे फळे किंवा घरी तयार केलेले कोणतेही पौष्टीक पदार्थ) दयावेत. बाळाच्या वाढीनुसार त्याच्या आहारात हळूहळू वाढ करावी.

५) बाळ आजारी असताना त्याला अधिक प्रमाणात द्रव पदार्थाची आवश्यकता असते.तसेच त्याला नियमित जेवण घेण्यासाठीही प्रोत्साहन दयावे आणि वारंवार स्तनपान दयावे. बाळ बरे झाल्यानंतर त्याला नियमित जेवणापेक्षा थोडे जास्त प्रमाणात जेवण दयावे जेणेकरुन आजारामध्ये बाळाची झालेली झीज भरुन येण्यास मदत होईल.

**६) स्तनपानामुळे बाळाला व मातेला खालीलप्रमाणे लाभ होतो.-**

- **बाळाचे फायदे :-**
  - त्वचेचा त्वचेशी संपर्क आल्यामुळे बाळ उबदार राहते.
  - लवकर दूध तयार होण्यास मदत होते.
  - बाळाला मातेचे पहिले दूध (कोलोस्ट्रोम ) पाजल्यामुळे रोगप्रतिकार शक्ती वाढते.
  - बाळ आणि मातेमध्ये जवळचे व जिव्हाळयाचे संबंध निर्माण होण्यास मदत होते.
  - अतिसार, न्युमोनिया, कान व घशाचे जंतुसंसंर्ग असे आजार होण्याचा धोका कमी होते.
  - बुध्दीमत्ता वाढवते.
  - वाढ आणि विकास होतो.
- **मातेस फायदे :-**
  - गर्भाशयाचे आकुंचन होण्यास मदत होते व वार लवकर पडते.
  - प्रसुतीनंतर मोठया प्रमाणात रक्तस्त्राव होण्याचा धोका कमी होतो.
  - गर्भाशय कॅन्सर, स्तनाचा कॅन्सर होण्याचा धोका कमी होतो.
  - हाडे ठिसूळ होण्याचा धोका कमी होतो.
  - प्रसुती पश्चात वजन घटण्यास मदत होते.
  - विनामुल्य बाळाचे पोषण होते.

*********************************************************************************

# प्रपत्र -२

## स्तनपान व आयवायसीएफ संबंधी आरोग्य संस्थांमधील विविध आरोग्य कर्मचाऱ्यांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या :-

❖ **आरोग्य कर्मचा-यांची कर्तव्ये व जाबाबदा-या खालीलप्रमाणे विभागली आहे.-**

अ) आरोग्य संस्थास्तरावरील आयवायसीएफ सेवा.

ब) सामाजिक स्तरावरील आयवायसीएफ सेवा.

क) गृहभेटीदवारे आयवायसीएफ सेवा.

**याबाबतचा सविस्तर तपशिल पुढील प्रमाणे.**

### अ) आरोग्य संस्थास्तरावरील आयवायसीएफ सेवा.

- **संस्थास्तरावरील आरोग्य कर्मचाऱ्यांची जबाबदारी :-**

१) जननी सुरक्षा योजना व जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांच्या अंमलबजावणीमुळे संस्थांमधील प्रसुतीचे प्रमाण वाढले आहे. सर्व आरोग्य संस्थामध्ये स्वाभाविक प्रसुतीसाठी एका तासाच्या आत स्तनपानाची सुरुवात म्हणजेच प्रसुतीनंतर एका तासाच्या आत स्तनपान याचे प्रमाण १००% होण्याचे ध्येय ठेवावे. गुंतागुंतीच्या प्रसुतीसाठी शक्य तेवढया लवकर परंतु ४ तासात स्तनपान करावे. आरोग्य संस्थांमध्ये जेंव्हा २ वर्षाखालील बालके येतात तेंव्हा आयवायसीएफच्या पध्दती व स्तनपान याबाबत माता व काळजीवाहकांचे प्रभावी समुपदेशन करण्यात यावे.

२) तसेच योग्य स्तनपान व पुरक आहारांच्या पध्दतीचा अवलंब करण्यासाठी सहाय्य करणे व माता / काळजी घेणाऱ्यांशी संवाद साधणे तसेच आयवायसीएफबाबत समुपदेशन करण्याची जबाबदारी आरोग्य सेविका/स्टाफ नर्स, सर्व कार्यक्रमा अंतर्गत नियुक्त समुपदेशक, वैद्यकिय अधिकारी यांची प्रामुख्याने असेल.

३) स्टाफ नर्सने संस्थेत दाखल झालेल्या सर्व बालकांची वजन / उंची घ्यावी आणि कमी वनज/उंची असणाऱ्या बालकांच्या मातांना/काळजी घेणाऱ्या व्यक्तीस योग्य पोषणांबाबत समुपदेशन करण्याच्या सूचना दयाव्यात.

४) रुग्णालयांमध्ये आरएमएनसीएचए समुपदेशक तसेच इतरही समुपदेशक यांची जबाबदारी संस्थांमधील बाहय रुग्ण विभाग, आंतररुग्ण विभाग व प्रसुती गृहातील मातांना आयवायसीएफचे समुपदेशन देण्याची राहील

५) पोषण पुनर्वसन केंद्राच्या पोषण तज्ञांनी सुध्दा मातांना स्तनपान व पोषण आहारा विषयीचे समुपदेशन करावे.

६) SNCU मधील सर्व स्टाफ नर्स यांना स्तनपान व्यवस्थापनाबाबतचे प्रशिक्षण देण्यात यावे. त्यांनी एसएनसीयसुमध्ये दाखल होणाऱ्या कमी वजनाच्या बालकांच्या मातांचे समुपदेशन करुन स्तनपानासाठी मदत करावी.

७) माता व बालक २४ तास सोबत राहतील अशी व्यवस्था करावी. (माता व बाळाला झोपण्यासाठी एकच बेड असवा). असे केल्यामुळे मातांचा स्तनपानाविषयी आत्मविश्वास वाढतो व आरोग्य केंद्रातून घरी गेल्यानंतरच स्तनपान चालू ठेवण्यास मदत होते.

८) स्तनपाना व्यतिरिक्त कृत्रिम पूरक आहार, पर्यायी पदार्थ यांचा वापर करण्याबाबत कोणत्याही आरोग्य संस्थेने किंवा कर्मचाऱ्यांनी समर्थन अथवा मातांना प्रवृत्त करु नये.

- **संस्था स्तरावरील स्तनपान व शिशुपोषण बाबत करावयाच्या कृतीः-**
  **माता व काळजीवाहक त्यांच्या सोयीनुसार आरोग्य संस्थांमध्ये समुपदेशनासाठी मार्गदर्शक सूचना व पध्दती -**

१) **प्रत्येक मातेला व्यक्तीशः समुपदेशन :-** प्रसुतीनंतर बाळाची काळजी घेण्यासाठी आवश्यक मार्गदर्शनासाठी माता/काळजीवाहक हे उत्सुक असतात. त्यामुळे या काळात सर्व माता व काळजीवाहकांना समुपदेशन करणे सर्वात योग्य आणि परिणामकारक आहे. बाळाच्या जन्मानंतर त्याच्या संगोपनाबाबत व पोषणाबाबत मातेला समुपदेशनाची गरज असते. तसेच आजारी, कुपोषित, कमी वजनाच्या बालकांच्या मातांना स्तनपाना विषयी व पोषणाबाबत माहिती देण्यासाठी ही पध्दत जास्त उपयुक्त आहे. यासाठी आरोग्य विभागाकडून दिलेल्या फिल्प चार्टचा वापर करण्यात यावा.

२) **गट समुपदेशन** :- प्रसुतीपूर्व तपासणी कक्ष, प्रसुतीपश्चात कक्ष, लसीकरण कक्ष, पोषण पुनर्वसन केंद्र या ठिकाणी वेळ निश्चित करुन सर्व गर्भवती व स्तनदा मातांची बैठक घेऊन समुपदेशन करण्यात यावे.

३) **दृक् - श्राव्य साधनांचा वापर** :- प्रसुतीपूर्व/ प्रसुतीपश्चात कक्ष, बाहय रुग्ण विभाग या कक्षामध्ये गर्भवती माता व कुटुंबियांपर्यंत पोहोचण्यासाठी उपलब्ध दृक् - श्राव्य साधनांचा चांगला उपयोग होतो. त्यामुळे या साधनांचा (उदा दूरदर्शन, रेडिओ, एफएम) वापर करावा.

४) **प्रसिध्दी साहित्य (पोस्टर इत्यादी)** :- स्थानिक भाषेमध्ये आयवायसीएफ बाबतचे पोस्टर प्रसुतीपूर्व व प्रसुतीपश्चात कक्षामध्ये, समुपदेशन कक्षात, बाल रुग्ण विभागात तसेच प्रतिक्षालयाच्या ठिकाणी दर्शनीय भागात लावावेत.

- **आरोग्य संस्थांमध्ये आयवायसीएफ बाबतच्या सेवा देण्यासाठी उपलब्ध संधीः-**

**१) प्रसुतीपूर्व तपासणी कक्ष :- प्रसुती होणाऱ्या सर्व संस्था.**
**कृती व महत्वाच्या बाबी :-**

- स्तनाची तपासणी आणि चीकाच्या दुधाचे महत्व समजावून सांगणे, जन्मानंतर लगेच स्तनपान व निव्वळ स्तनपान याबाबतचे समुपदेशन प्रसुतीपूर्व तिसऱ्या तपासणीच्या वेळेस सुरु करण्यात यावे.
- एचआयव्ही बाधीत /संक्रमीत मातेला स्तनपानाबाबतचे समुपदेशन करावे.
- स्तनपानासंबंधी इतर आवश्यक माहिती व सहाय्य आवश्यक असल्यास स्त्रोता बद्दल माहिती देणे.
- स्तनपानाच्या योग्य पध्दतींची माहिती देणे.
- प्रत्येक महिन्याच्या ९ तारखेला एएनसी क्लिनीकमध्ये प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाअंतर्गत मातांचे समुपदेशन करणे.

**प्राथमिक जबाबदारी** :- स्टाफ नर्स, आरएमएनसीएचए व इतर सर्व समुपदेशक

**सहाय्यक भूमिका :-** वैद्यकिय अधिकारी

२) **प्रसुतीगृह :- प्रसुती होणाऱ्या सर्व संस्था.**

**कृती व महत्वाच्या बाबी :-**

- जन्मांनंतर ब्रेस्ट क्रॉल पध्दतीनेच स्तनपानास सुरुवात करणे. प्रत्येक नवजात अर्भक जन्मानंतर लगेचच आईच्या पोटावर ठेवल्यास स्वतः आईचे स्तनाग्र शोधून पहिले स्तनपान लवकरात लवकर घेते याला ब्रेस्ट क्रॉल असे म्हणतात. यामुळे बाळाला लवकरात लवकर स्तनपान करण्यास मदत होते. आईचे गर्भशयाचे आकुंचन होण्यास मदत होते व वार लवकर पडते. प्रसुतीनंतर मोठया प्रमाणात रक्तस्त्राव होण्यास प्रतिबंध होतो.
- याबाबत मातेचा आत्मविश्वास वाढण्यासाठी व बाळाला व्यवस्थित स्तनपान करण्यासाठी मदत करणे.

**प्राथमिक जबाबदारी** :- प्रसुती करणाऱ्या एएनएम, स्टाफ नर्स, वैद्यकिय अधिकारी

३) **प्रसुती पश्चात कक्ष :- प्रसुती होणाऱ्या सर्व संस्था**

**कृती व महत्वाच्या बाबी :-**

- बाळाच्या जन्मानंतर एक तासाच्या आत स्तनपान झाल्याची खात्री करवी.
- लवकरात लवकर स्तनपान देण्यासाठी, इतर कृत्रिम पदार्थ टाळण्यासाठी, कोलोस्ट्रम (आईचे पहिले दूध) देण्यासाठी निव्वळ स्तनपान सुरु ठेवण्यासाठी साहय करावे.
- स्तनाच्या स्थितीचे व्यवस्थापन करावे.
- बाळाला स्तनपान करताना स्तनपानाच्या अयोग्य पध्दतीबाबत आरोग्य सेविकांनी परिक्षण करावे व त्यानुसार योग्य पध्दतीबाबत मातेला माहिती दयावी व मदत करावी.

- जन्माच्या वेळीचे वजन घेणे, जन्मतः कमी वजन असलेल्या बालकांचे योग्य व्यवस्थापन करणे.
- एचआयव्ही बाधीत मातांना स्तनपान देण्याच्या पध्दतींबाबतचे प्रसुतीपुर्व व प्रसुतीनंतर समुपदेशन करणे.
- सर्व प्रसुती केंद्रामध्ये एक तासाच्या आत स्तनपान झालेल्या बालकांची अचूक नोंदणी रजिस्टरमध्ये करावी.
- प्रसूतीपूर्व कक्षात, प्रसुतीगृहांमध्ये व प्रसुतीनंतरच्या कक्षात बाळाला लवकरात लवकर स्तनपान आणि निव्वळ स्तनपान याबाबत उपलब्ध प्रसिध्दी साहित्ये दर्शनिय भागात लावावे.

**प्राथमिक जबाबदारी** :- प्रसुती करणारे एएनएम, स्टाफ नर्स, वैद्यकिय अधिकारी,

**४) बाहय रुग्ण विभाग (लसीकरण कक्ष, वेल बेबी क्लिनीक, बालरुग्ण विभाग, आयसीटीसी) :-**

**कृती व महत्वाच्या बाबी :-**

- निव्वळ स्तनपान आणि पूरक आहार या विषयी वारंवार माहिती देणे.
- स्तनपानाबाबतच्या अडचणीवर चर्चा करुन उपाययोजना करणे.
- सर्व बालकांची वजन वाढ तपासणे आणि **WHO** growth chart नुसार सॅम मॅम बालके शोधणे आणि त्यांचे योग्य व्यवस्थापन करणे.
- गट समुपदेशनाद्वारे मातांचे आयवायसीएफ आणि गरोदरपणातील व प्रसुतीपश्चात घ्यावयाच्या आहाराबाबत समुपदेशन करणे.
- स्तनदा माता स्तनपान कसे करतात याबाबत निरीक्षण करणे आणि वयानुसार बाळाला पोषक आहार कसा दयावा याचे समुपदेशन करणे.
- एचआयव्ही बाधीत असलेल्या मातांना स्तनपानाच्या पध्दतीबाबत आणि पर्यायाबाबत माहिती असल्याची खात्री करणे.

जास्त प्रसुती असलेल्या संस्थांमध्ये स्थापन झालेल्या आयवायसीएफ समुपदेशन केंदातील आरएमएनसीएचए समुपदेशक/ नियुक्त स्टाफ नर्स यांनी ठरलेल्या वेळेमध्ये केंद्रात उपस्थितीत राहावे आणि संदर्भित केलेल्या मातांना समुपदेशन करावे.

**प्राथमिक जबाबदारी** :- स्टाफ नर्स, व आरएमएनसीएचए तसेच इतर सर्व समुपदेशक.

**सहाय्यक भूमिका :-** वैद्यकिय अधिकारी

**५) आंतररुग्ण विभाग (बालरुग्ण विभागात भरती होणारी आजारी बालके) :- प्रसुती होणाऱ्या सर्व संस्था :-**

**कृती व महत्वाच्या बाबी :-**

- स्तनपान आणि स्तनांची स्थिती याबाबत परिक्षण करणे, स्तनपानासंबंधीच्या अडचणीबाबत उपाययोजना करणे.
- दाखल असलेल्या सर्व बालकांची वजन/उंची तपासून कमी वजनांची तसेच सॅम / मॅम बालके शोधणे आणि त्यांच्या पोषणाबाबत मातांचे समुपदेशन करुन व्यवस्थापन करणे.
- **आएमएस ॲक्टची** (Infant Food & Milk Substitute) **अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत अंमलबजावणी**- आईच्या दुधास पर्याय देणाऱ्या घटकांची/ उत्पादनांची जाहिरात करणे अथवा त्यांची मदत घेणे हे आयएमएस ॲक्ट अन्वये बेकायदेशीर आहे. आईच्या दूधाला पर्याय देणाऱ्या घटकांची जाहिरात व वापर यास प्रतिबंध करणे. अशा संस्थांकडून कोणत्याही प्रकाराची मदत घेण्यात येऊ नये व जाहिरात करण्यात येऊ नये.
- बालकाच्या वयानुसार आजारी बालकांच्या व इतर बालकांच्या आहाराबाबत योग्य संदेश देणे.

**प्राथमिक जबाबदारी** :- स्टाफ नर्स, व आरएमएनसीएचए व इतर समुपदेशक

**सहाय्यक भूमिका :-** मेट्रन, वैद्यकिय अधिकारी.

**६) विशेष नवजात शिशू काळजी कक्ष (एसएनसीयु) :-**

**कृती व महत्वाच्या बाबी :-**

- जन्मतः कमी वजन असणाऱ्या बालकांना व मुदतीपुर्व प्रसुती झालेल्या बालकांना स्तनपान देणेबाबत, मातांनी बाळांना स्वतःचे दूध हाताने काढून वाटी चमच्याने दूध पाजणेबाबत आणि डिस्चार्ज होण्यापुर्वी बालकांना वयानुरुप पोषण आहार देणेबाबत समुपदेशन करणे.

**प्राथमिक जबाबदारी** :- स्टाफ नर्स, इनचार्ज सिस्टर, आरएमएनसीएचए व इतर समुपदेशक

**सहाय्यक भूमिका :-** वैद्यकिय अधिकारी.

- **सामाजिक स्तरावर आयवायसीएफ बाबतच्या संधी :-**

**१) आयवायसीएफ बाबतच्या मार्गदर्शक तत्वांचा सामाजिक स्तरावर प्रचार करणे.**

- आयवायसीएफचा प्रचार करण्यासाठी महत्वाच्या संपर्काच्या संधी
  - ग्राम आरोग्य व पोषण दिन.
  - आशांद्वारे गृहभेटी.
  - उपकेंद्रस्तरावरील नियमित लसीकरण सत्र.
  - अंगणवाडी केंद्रामधील वाढ व विकास सत्र.
  - वर्षातून दोन वेळा घेण्यात येणारी जंतनाशक औषधी व जीवनसत्व अ मोहिम.
  - सामाजिकस्तरावर आयएमएनसीआय /आजारी बालकांना सल्ला.

- विशेष कार्यक्रम (उदा.स्तनपान सप्ताह, वजन दिवस).
- राज्यस्तरावरुन घेण्यात येणारे इतर महत्वाचे कार्यक्रम. उदा. सॅम बालकांचा शोध व तपासणी.

- माता व काळजीवाहकांना बालकांच्या पोषणाबाबतचे समुपदेशन करण्याची मुख्य जबाबदारी एएनएमने आशांच्या सहाय्याने पार पाडणे आवश्यक आहे. आयवायसीएफचा प्रसार करण्यासाठी आशा कार्यकर्ती मुख्य प्रवर्तक आहे. यासाठी आशांना प्रशिक्षण दिले जावे जेणे करुन आयवायसीएफ कार्यक्रमाचा प्रसार तिच्याद्वारे चांगल्या प्रकारे होऊ शकतो. या कार्यक्रमांमध्ये आशा कार्यकर्तीची समूहसंघटक व स्तनपान विषयक प्रसारक अशी जबाबदारी आहे. आशांने स्तनपान विषयक बार्बीचा प्रसार करावा स्तनपानास अडचणी असणाऱ्या मातांना उपचारासाठी प्रशिक्षीत एएनएमकडे संदर्भित करावे. एएनएमने आशांकडून संदर्भित होणाऱ्या सर्व मातांचे समुपदेशन करावे. यासाठी एएनएम अंगणवाडी सेविकेची मदत घेऊ शकते.

**२) सामाजिक स्तरावर माता व काळजीवाहकांपर्यंत पोहचण्यासाठीचे कार्यक्रम :-**
**माता व काळजीवाहक त्यांच्या सोयीनुसार सामाजिक स्तरावर खालीलप्रकारे पोहचू शकतात**

- **वाढ व विकास तपासणी सत्र** :- अंगणवाडी केंद्रात आणि ग्राम आरोग्य दिनादिवशी बालकांच्या वजनवाढीची केली जाणारी तपासणी व एमसीपी कार्डमध्ये केली जाणारी नोंद हा महत्वाचा घटक असून आयवासीएफ बाबतचे समुपदेशन करण्यासाठी योग्य वेळ आहे.

- **समुह बैठक :-** ग्राम आरोग्य पोषण दिनादिवशी सर्व मातांना बालकांच्या लसीकरणाबाबत, जीवनसत्व Micronutrients व पोषण आहाराबाबत समुपदेशन करावे.

- **प्रत्येक मातेस व्यक्तीशः समुपदेशन :-** सामाजिक स्तरावर सॅम/मॅम बालकांच्या मातांचे समुपदेशन करण्यासाठी आशा व एएनएमकरिता हि समुपदेशनांची सर्वात उत्तम पध्दत आहे. सॅम/मॅम बालकांच्या योग्य व्यवस्थापनासाठी व उपचारासाठी त्यांना गरजेनुसार योग्य संस्थांना संदर्भित करणे आवश्यक असते. या पध्दतीमुळे मातांच्या आर्थिक अडचणी व पारंपारिक रुढी परंपरामुळे स्तनपानामध्ये व शिशुपोषणामध्ये येणाऱ्या अडचणी माहित होतात आणि त्याबाबत योग्य प्रकारे व्यक्तिगत पातळीवर मातेला समुपदेशन करता येते.

- **प्रसिध्दी साहित्य महत्वाच्या ठिकाणी लावणे :-** स्थानिक भाषेमध्ये आयवायसीएफ बाबतचे उपलब्ध प्रसिध्दी साहित्य अथवा आवश्यकतेनुसार तयार करुन महत्वाच्या ठिकाणी (आरोग्य संरक्षक भिंत, अंगणवाडी, ग्राम पंचायत, आरोग्य संस्था) प्रदर्शित करण्यात यावे. त्याप्रमाणे आरोग्य सेवा सत्रांमध्ये देखील सदरचे प्रसिध्दी साहित्य प्रदर्शित करण्यात यावे. या संदेशाच्या माध्यमातून योग्य असणाऱ्या पारंपारिक रुढी यांना प्रोत्साहन व चुकीचे असणारे समज निवारण करण्यात यावे.
- स्तनपाना विषयीची सामाजामध्ये जागृती ही फक्त स्तनपान सप्ताह अथवा पोषण आहार सप्ताह यापुर्तीच मर्यादित न ठेवता वर्षभर चालणारी निरंतर प्रक्रिया असावी. यामध्ये महत्वाचे संदेश समाजापर्यंत पोहचविण्याची प्रक्रिया व्हावी.

- **सामाजिकस्तरावर आयवायसीएफचे संदेश देण्यासाठी महत्वाचे कार्यक्रम :-**

१) **ग्राम आरोग्य व पोषण दिन :-** अंगणवाडी, उपकेंद्र किंवा जेथे ग्राम आरोग्य दिन व पोषण दिन आयोजित करण्यात येतो अशी ठिकाणे

- **कृती व महत्वाच्या बाबीं :-** गरोदर मातांना स्तनपानाबाबत माहिती देण्यात यावी. व प्रसुतीनंतर बाळाला लवकरात लवकर स्तनपान करण्याविषयी प्रोत्साहन दयावे.
- **करावयाची कृती :-** समुहबैठकीमध्ये मातेचा आहार, स्तनपान, पूरक आहार याबाबत समुपदेशन करावे.
- **सदरची सेवा कोणी दयावी :-** आरोग्य सेविका.

शक्य असेल तेथे स्थानिकस्तरावर उपलब्ध असलेल्या अन्नपदार्थापासून ६ महिने पूर्ण ते २३ महिने वयोगटातील बालकांकरिता आहाराचे प्रात्यक्षिकाचे आयोजन करावे. त्याचप्रमाणे मातेचा आहार व स्तनपान याबाबत समुहबैठकीमध्ये समुपदेशन करण्यात यावे.

- **मदत करणारा गट :-** अंगणवाडी कार्यकर्ती, आशा स्वयंसेविका, आरोग्य सहाय्यीका व अंगणवाडी मुख्य सेविका

२) **नियीमत लसीकरण सत्र :-** अंगणवाडी किंवा उपकेंद्र अथवा ज्याठिकाणी लसीकरण सत्रांचे आयोजन करण्यात येते असे ठिकाण.

- **करावयाची कृती :-** वयोगटानुसार आयवायसीएफबाबतची माहिती तसेच मातेचा आहार याबाबत समुहबैठकी दरम्यान समुपदेशन करावे.
- **सदरची सेवा कोणी दयावी :-** आरोग्य सेविका.
- **मदत करणारा गट :-** अंगणवाडी कार्यकर्ती, आशा स्वयंसेविका

३) **द्विवार्षीक जंतनाशक मोहिम व जीवनसत्व अ मोहिम :-** अंगणवाडी किंवा उपकेंद्र अथवा ज्याठिकाणी सदर मोहिमेचे आयोजन करण्यात येते असे ठिकाण.

- **करावयाची कृती :-** स्तनपान व पोषक पूरक आहार व मातेचा आहार याबाबत गटांचे समुपदेशन करणे.
- **सदरची सेवा कोणी दयावी :-** आरोग्य सेविका.
- **मदत करणारा गट :-** अंगणवाडी कार्यकर्ती, आशा स्वयंसेविका

४) **आयएमएनसीआय/आजारी (बालकांचे क्लिनीक) :-** ग्राम पातळीवर, उपकेंद्र व अंगणवाडीस्तरावर बालकांची तपासणी.

- **करावयाची कृती :-** वयोगटानुसार बालकाचा आहार व आहारबाबतच्या समस्या जाणून घेणे व त्यावर उपाय योजना सांगणे. तसेच आजारी बालकांच्या आहाराबाबत मार्गदर्शन करणे.
- **सदरची सेवा कोणी दयावी :-** आरोग्य सेविका.
- **मदत करणारा गट :-** अंगणवाडी कार्यकर्ती, आशा स्वयंसेविका

५) **स्तनपान सप्ताह :-**

- स्तनपान सप्ताहामध्ये माता बैठका घेण्याकरिता प्रत्येक बैठकीकरिता रु.२५०/- अनुदान आशांना देण्यात यावे. या बैठकांमध्ये स्तनपानाबदल चर्चा करावी, जन्मापासून सहा महिन्यापर्यंत निव्वळ स्तनपान, सहा महिने पूर्ण झाल्यावर वरचा पूरक आहार, नियीमत लसीकरण व कुटुंब नियोजन इत्यादी बाबतच्या सूचना द्याव्यात.
- या कार्यक्रमाद्वारे नियमित घरभेटीमध्ये लवकरात लवकर स्तनपान, चीकाचे दुध पाजणे, ६ महिन्यापर्यंत निव्वळ स्तनपान तसेच कमी वजनाच्या व कमी दिवसाच्या बालकांमध्ये स्तनपान व त्यामधील अडचणी यावर भर देण्यात यावा.
- स्तनपान सप्ताह कालावधीत आरोग्य सेविकेकडील एमसीटीएस वर्क प्लॅननुसार लाभार्थ्यांची यादी तयार करावी व त्यांना आयवायसीएफबाबतचा सल्ला दयावा.

**घरच्या घरी बालकांना स्तनपान व शिशुपोषणबाबतच्या सेवा :-**

१) **घरभेटीद्वारे आयवायसीएफ पध्दती व त्याला प्रोत्साहन देणारी मार्गदर्शक तत्वे :-** क्षेत्रियस्तरावर आरोग्य सेविका व आशाद्वारे नवजात बालकांच्या सेवा त्याचप्रमाणे प्रसुती पश्चात मातांना वेगवेगळया मातृत्व सेवाबाबतची माहिती देण्यात यावी. तसेच २ वर्षापर्यंतच्या कमी वजनाच्या बालकांची घरच्या घरी काळजी आशाद्वारे घेण्यात यावी.

२) **नियमित घरभेटीमध्ये मातांना संदेश देण्याची आशांना संधी :-**

- प्रसुतीपश्चात घरभेटी
- आरोग्य व पोषण दिनाकरिता लाभार्थ्यांना जमा करणे.

- अंगणवाडीमध्ये व गृहभेटिच्या वेळेस वाढीचे तक्ते वापरुन वाढीचे ससंनियंत्रण (Monitoring ) करणे.
- महिला गट चर्चा व स्वयंसहाय्यता गट सभा.

- आशाच्या घरभेटीमध्ये २ वर्षाखालील एखादे बालक पुरेसा आहार घेत नसेल व त्यामुळे ते कुपोषित आढळल्यास सदरची बाब आरोग्य सेविकेच्या निदर्शनास आणून देणे. त्याचप्रमाणे अंगणवाडी केंद्राशी समन्वय करणे व योग्य ठिकाणी संदर्भित करणे.
- जन्मानंतर सुरुवातीच्या महिन्यामध्ये बाळाची वाढ योग्य प्रकारे होत असल्याची खात्री करणे आवश्यक आहे. बाळाच्या वजनाची वाढ होत नसल्यास याबाबतचे निदान वेळेवर होणे आवश्यक आहे. पहिल्या काही महिन्यातच अयोग्य /वरचा आहार देण्याच्या पध्दतीमुळे बाळाला जंतुदोष होतो. अशा वेळेस त्याचे योग्य निदान करुन आणि चुकीचा आहार देण्याच्या पध्दती सुधारुन योग्य पध्दतीने आहार देण्याबाबतचे समुपदेशन करावे. तपासणी दरम्यान बाळाची वाढ कमी होत असल्याचे आढळल्यास योग्य ठिकाणी संदर्भित करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात यावे.

*********************************************************************************